



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## अभ्यासकेंद्र

# यशवंत महाविद्यालय, सेलू (4537A) जि. वर्धा

## NEWS AT GLANCE

लोकमत सोमवार दि. १८ फेब्रुवारी २०१९ २

थोडक्यात जिल्हा




### यशवंत महाविद्यालयात क्रीडा स्पर्धा

### यशवंत महाविद्यालयात क्रीडा स्पर्धा

सेलू : येथील यशवंत महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांकरिता विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन प्राचार्य डॉ. विजय बोबडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. प्रवीण ठाकरे, उत्तम राऊत, उपप्राचार्य नरेंद्र जाधव, पर्यवेक्षक प्रा. गजानन केचे, प्रा. सुरेश यावलीकर, प्रा. प्रफुल्ल बनसोड उपस्थित होते. कबड्डी स्पर्धेत सरदार पटेल संघ, खो-खो स्पर्धेत मुलींचा संघ, व्हॉलिबॉलमध्ये ए संघ विजयी झाले. गोळाफेक स्पर्धेत मुलांमधून आशिष पठाण तर मुलींमधून शाहिस्ता शेख यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. यशस्वितेसाठी सुरज सातरकर...

### मुक्त विद्यापीठाचा अभ्यासक्रम उपयुक्त



### स्पर्धा परीक्षेसाठी मुक्त विद्यापीठाचा अभ्यासक्रम उपयुक्त : प्रा. वगरकर



विद्यार्थियों का सत्कार समारोह का हुआ आयोजन

### स्पर्धा परीक्षा के लिए मुक्त विद्यापीठ का पाठ्यक्रम उपयुक्तः प्रा. वगरकर

सेलू पारंपारिक पाठ्यक्रम की तुलना में मुक्त विद्यापीठ के पाठ्यक्रम से स्पर्धा परीक्षा में बैठने वाले विद्यार्थियों को लाभ हो रहा है। इस पाठ्यक्रम की तैयारी कर अनेक विद्यार्थी संघ लोकसेवा आयोग की परीक्षा उत्तीर्ण कर जिलाधिकारी व पुलिस अधीक्षक बने हैं। यह विचार केंद्र संयोजक प्रा. प्रमोद वगरकर ने व्यक्त किए। यशवंत महाविद्यालय में ... विद्यापीठ की ओर से नव प्रवेशित विद्यार्थियों के स्वागत समारोह में वे बोल रहे थे। कार्यक्रम की अध्यक्षता प्रा. डॉ. विजय बोबडे, सत्कारमूर्ति प्रा. प्रकाश नाथे, गजेंद्र फुसे, उ. नरेंद्र जाधव, पर्यवेक्षक प्रा. गजानन केचे, अनिल नांदुरकर उपस्थित थे। मुक्त विद्यापीठ के प्रवेशित विद्यार्थी सोनम लोणकर, मंगला खोडेकर, दामिनी दुले, शंभरकर, प्रा. सी. बी. देशमुख ने विचार व्यक्त किए।

### यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातर्फे क्रीडा स्पर्धांचे आयोजन






Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner







Scanned with CamScanner

8.4.2026
दैनिक
# नवराष्ट्र निर्माण
Khwaja00078@gmail.com
Mobile No.: 9356446902
महाराष्ट्रातील | चंद्रपूर | गडचिरोली | नागपूर | भंडारा | गोंदिया | वर्धा | अमरावती | यवतमाळ | अकोला | पुणे | येथून एकाच वेळी प्रकाशित
उप संपादक- भास्कर अतकरी ■ कार्यकारी संपादक - मयुर सूर्यकांत तिरपुडे ■ निवासी संपादक-एस.एस. खवाजा
नवराष्ट्र निर्माण न्यूज
नवीन संकल्प, नवा भारत
मो. क्र. 9356446902

# ध्येय, परिश्रम आणि आत्मविश्वास- विद्यार्थ्यांच्या यशाचा खरा मंत्र!



**नवराष्ट्र निर्माण, प्रतिनिधी**

**वर्धा/ सेलू, दि. ७ :** स्पर्धेच्या युगात प्रत्येक क्षेत्रात यश मिळवण्यासाठी केवळ अभ्यास नव्हे, तर योग्य ध्येय, सातत्यपूर्ण परिश्रम आणि आत्मविश्वास या त्रिसूत्रीची गरज आहे, असे प्रतिपादन विस्तार अधिकारी (शिक्षण विभाग) अर्चना पुरेड्डीवार यांनी केले.सेलू येथील यशवंत महाविद्यालयात ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख होते.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून अर्चना पुरेड्डीवार, प्राचार्य डॉ. संदीप काळे, प्रा. अमित चिनेवार, प्रा. सुनील धनुळे आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यावेळी बोलताना पुरेड्डीवार यांनी विद्यार्थ्यांना आपल्या क्षमतेची जाणीव ठेवून सातत्याने प्रयत्न करण्याचा सल्ला दिला. तसेच नकारात्मक विचारांपासून दूर राहून सकारात्मक दृष्टिकोन अंगीकारणे हेच यशाचे गमक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. नृत्य, गायन, विज्ञान प्रदर्शन, पोस्टर रांगोळी, मेहंदी, कथाकथन, निबंध अशा विविध स्पर्धांमध्ये प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

तसेच क्रीडा विभागात कबड्डी खो-खो, क्रिकेट, शॉटपुट व गोळाफेक स्पर्धांतील विजेत्यांनाही गौरवण्यात आले. या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सोनाली ठाकरे यांनी केले, तर उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

Scanned with CamScanner

देशोन्नती
वर्धा | बुधवार | दि.१७ सप्टेंबर २०२५
www.deshonnati.wardha@gmail.com
epaper.deshonnati.com

# विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्यातील संवाद पूल म्हणजेच पालक - शिक्षक सभा - प्राचार्य डॉ. संदीप काळे

देशोन्नती वृत्तसंकलन

**सेलू :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पालक व शिक्षकांमध्ये सुसंवाद असणे गरजेचे आहे. पालक व शिक्षकांच्या सुसंवादावर विद्यार्थ्यांची व त्यासोबतच शिक्षण संस्थेची सुद्धा भरभराट होत असते. अशा सभाद्वारे पालक व शिक्षक एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करीत असतात, ज्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे वर्तन,प्रगती आणि अभ्यास सुधारत असतो. विद्यार्थी हे शिक्षकांचे आराध्य दैवत आहे. विद्यार्थी हेच महाविद्यालयाची खरी समृद्धी आहे. 'पालक - शिक्षक सभा' ही विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्यातील संवाद पूल आहे. या सभेमुळे विद्यार्थी विकासासाठी एकत्रित प्रयत्न करता येतात, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप काळे यांनी व्यक्त केले.



कार्यक्रमाला पालक - शिक्षक सभेचे समन्वयक प्रा. डॉ. अनंत रिंढे, विज्ञान शाखाप्रमुख प्रा. स्मिता

तेलरांधे, पालक प्रतिनिधी मीना गायकवाड, श्री हनी मॅसी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यशवंत महाविद्यालय सेलू येथील पालक - शिक्षक सभेत अध्यक्ष म्हणून ते बोलत होते.

पुढे बोलतांना श्री.काळे म्हणाले,पालकांनीसुद्धा मुलांना अभ्यासाबद्दल जागृत केले पाहिजे. आपला मुलगा महाविद्यालयामध्ये किती वाजता जातो, किती वाजता घरी पोहोचतो याकडे लक्ष दिले पाहिजे. अशा सभेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व महाविद्यालयाच्या सुविसुविधा विषयी चर्चा होते व अशा चर्चेमधून अनेक स्तुत्य उपक्रम बाहेर येत असतात, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पालक - शिक्षक सभेचे समन्वयक प्रा. डॉक्टर अनंत रिंढे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्तविकेमधून महाविद्यालयात शिक्षक - पालक सभा का घेतली पाहिजे , याचे महत्त्व विशद केले.

याप्रसंगी स्मिता तेलरांधे यांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या सुविधा विषयी माहिती दिली त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासामध्ये पालकांचा प्रवास सुद्धा महत्त्वाचा आहे, त्यामुळे पालकांनी सुद्धा आपल्या मुलांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे, असे विचार व्यक्त केले.

याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित पालक प्रतिनिधी मीना गायकवाड व श्री हनी मॅसी यांनी सुद्धा आपले मत व्यक्त केले. या पालक - शिक्षक सभेला विभा मांडवकर, गणेश मस्के, रमेश चौधरी यासह ४६ प्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विद्याश्री हिंगे यांनी तर आभार प्रा. शैलेश बीसेन यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. सोनाली पावडे, प्रा. वनिता शिंदे, प्रा. किशोरी कोहाड, प्रा. देवयानी ढोबळे, प्रा. सीमा देशमुख, प्रा. भूषण तुरणकर, प्रा. संगीता खोडे, प्रा. अर्चना डहाणे, प्रा. प्रणिता चाफले, प्रा.अर्चना बारंगे, प्रा. सुदर्शन भगत तसेच शिक्षकेतर कर्मचारी सुरेश पुसाम, बाबूराव सोनवणे यांनी सहकार्य केले. तालुका प्रतिनिधी

Scanned with CamScanner

देशोन्नती
- वर्धा | शुक्रवार | दि. २६ सप्टेंबर २०२५ | www.deshonnati.wardha@



- डॉ. मंजुषा देशमुख यांचे प्रतिपादन
- यशवंत महाविद्यालय सेलू येथे समाज विज्ञान अभ्यास मंडळाचे उद्घाटन

# भाषिक कौशल्य व्यक्तिमत्व विकास व स्वयंरोजगाराचे साधन

देशोन्नती वृत्तसंकलन

**सेलू** : भाषिक कौशल्याचे विद्यार्थ्यांना आपल्या जीवनातील महत्त्व सांगून त्यांचे प्रयत्न पूर्वक अधिक महत्वाचे पैलू लक्षात घेतल्यास विद्यार्थी दशेला दिशा प्राप्त होऊन जगण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. यात पारंगत असलेला कुशल होऊन यशाच्या संधी प्राप्त करतो. आपले व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी भाषिक कौशल्य अवगत होऊन आपले आणि सोबतच समाजाचे जीवनमान उंचावू शकते आणि स्वतः बरोबर समाजाचेही सहाय्य करू शकते. श्रवण, वाचन, संवाद, लेखन या भाषिक कौशल्यातून पारंगत होऊन आपले जीवन यशस्वी बनविता येते. तसेच भाषांतर, अनुवाद,

लेखन, पत्रकारिता, प्रकाशन आदी विविध क्षेत्रात रोजगाराची संधी सहज उपलब्ध होऊ शकते. असे प्रतिपादन आपल्या व्याख्यानात प्रियदर्शिनी महिला महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. मंजुषा देशमुख यांनी व्यक्त केले. यशवंत महाविद्यालय, सेलू येथील मराठी विभागातर्फे समाज विज्ञान अभ्यास मंडळाच्या उद्घाटन सोहळयाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. समीक्षा सावरकर व आरती बिसेन यांनी स्वागतगीत सादर केलें. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संदीप काळे होते. जीवनात एकदा आलेल्या त्यांनी अपयशाने खचून न जाता स्वतःच्या उद्धारासाठी पुन्हा सातत्याने प्रयत्न करून उच्चतम शिखर गाठता येते व स्वतः बरोबर समाजाची ही सेवा करता येते. अशी यशाची व्याख्या विविध यशस्वी उदाहरणाच्या माध्यमातून त्यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मंजुषा देशमुख होत्या. कार्यक्रमाच्या संयोजक प्रा. जयश्री देशमुख, प्रा. भूषण तुरणकर प्रा. संगीता खोडे , कार्यक्रमाच्या समन्वयक म्हणून प्रा. अर्चना बारंगे , अभ्यास मंडळाची अध्यक्ष वैष्णवी धानकुटे यांची मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमात यशवंत महाविद्यालय सेलू येथील अभ्यास मंडळाची कार्यकारणी गठित करण्यात आली. यात वैष्णवी किशनजी धानकुटे (मराठी भाषा) हिची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तर उपाध्यक्ष म्हणून निखिल राजेंद्र दुरतकर, (इंग्रजी), सचिवपदी कु. विशाखा सुधाकर काकडे (इतिहास), यांची नेमणूक करण्यात आली.

तर अभ्यास मंडळाच्या कार्यकारणीचे सदस्य म्हणून मिताली दिलीप तित्तरमारे (अर्थशास्त्र), मालती नंदलाल नेहारे (गृहअर्थशास्त्र), दुर्गा ज्ञानेश्वर मांढरे (राज्यशास्त्र) सुहानी ज्ञानेश्वर गुडीमेश्राम (इंग्रजी साहित्य); साक्षी गुणवंत छापेकर (मराठी साहित्य), दिव्यानी भूदास मुडे (समाजशास्त्र) यांची नेमणूक करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन प्रजिता पारसे यांनी केले. आभार साक्षी छापेकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद , कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवून कार्यक्रम यशस्वी केला. **तालुका प्रतिनिधी**

## अभ्यास मंडळाची कार्यकारणी गठित

यशवंत महाविद्यालयात अभ्यास मंडळाची कार्यकारणी गठित करण्यात आली. यात वैष्णवी धानकुटे (मराठी भाषा) हिची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तर उपाध्यक्ष म्हणून निखिल दुरतकर, (इंग्रजी), सचिवपदी विशाखा काकडे (इतिहास), यांची नेमणूक करण्यात आली. तर अभ्यास मंडळाच्या कार्यकारणीचे सदस्य म्हणून मिताली तित्तरमारे (अर्थशास्त्र), मालती नेहारे (गृहअर्थशास्त्र), दुर्गा मांढरे (राज्यशास्त्र) , सुहानी गुडीमेश्राम (इंग्रजी साहित्य), साक्षी छापेकर (मराठी साहित्य), दिव्यानी मुडे (समाजशास्त्र) यांची नेमणक करण्यात आली

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner